RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १०, अंक १३] सोमवार, फेब्रुवारी १२, २०२४/माघ २३, शके १९४५ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक १६

प्राधिकृत प्रकाशन

### विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून

**अनुसूची-V**

महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा नमुना.

**अधिसूचना**

क्रमांक मशा/कार्या-५/प्रशासन/पेसा/एस.आर-८१/२०२३.—महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पाडा/ पाड्यांचा समूह, वस्ती/ वस्त्यांचा समूह, वाडी/वाड्यांचा समूह गाव म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येते ;

आणि ज्याअर्थी, **पालघर** तालुक्यातील **पोचाडे-तामसई** ग्रामपंचायतीतील **उधाणपाडा व किणीपाडा** पाडा/वस्ती/पाड्यांचा समूह/वस्त्यांचा समूह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक **१२ ऑगस्ट २०१४** रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, **उपविभागीय अधिकारी, पालघर** यांनी यासंदर्भात दिनांक **२१ सप्टेंबर २०१८** रोजी **पोचाडे-तामसई** ग्रामपंचायतीत येणाऱ्या पाडा/वस्ती/पाड्यांचा समूह/वस्त्यांचा समूह यांची संबंधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे ;

आणि ज्याअर्थी, **जिल्हाधिकारी, पालघर** यांनी चौकशी अंती संबंधित पाडा/वस्ती/पाड्यांचा समूह/वस्त्यांचा समूह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे.

आणि त्याअर्थी, मी, **डॉ. महेंद्र कल्याणकर, विभागीय आयुक्त, कोकण विभाग** पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **पालघर** तालुक्यातील **पोचाडे-तामसई** ग्रामपंचायतीतील **उधाणपाडा व किणीपाडा** येथे पाडा/

वस्ती/ पाड्यांचा समूह/वस्त्यांचा समूह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशील तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपारिक हद्द खालीलप्रमाणे आहेः—

| अ. क्र. | हद्दीचे तपशील | समूह नंबर/ कम्पार्टमेंट नंबर | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| १. | पूर्वेस | १६४ | वैतरणा नदी |
| २. | पश्चिमेस | --- | डोंगर व बहाडोली गाव |
| ३. | दक्षिणेस | १६४ | बहाडोली शिव |
| ४. | उत्तरेस | १६४ | पोचाडे गाव |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळून उरलेले क्षेत्र मूळ गाव म्हणून ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कोंकण भवन, नवी मुंबई,
दिनांक २ जानेवारी २०२४.

**डॉ. महेंद्र कल्याणकर,**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग.